**आरोग्य सेवा आयुक्तालयांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (एस-२०) मधील अधिकाऱ्यांचे वयाच्या ५०/५५ व्या वर्षानंतर सेवा पुनर्विलोकन करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०२६/ई-१६२६८९०/सेवा-१**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार संकुल इमारत
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
दिनांक: ०८ मे, २०२६

**वाचा :**

१) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग क्र. एलपीएल-२०१७/प्र.क्र.२१/का.पंधरा, दि. १०.०६.२०१९

२) शासन निर्णय क्रमांकः सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. समिती-२०२१/प्र.क्र.४४१/सेवा-३, दि. ०२.११.२०२१

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ च्या नियम १० (४) व ६५ अनुसार सार्वजनिक हितास्तव अकार्यक्षम व संशयास्पद सचोटीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना वयाच्या ५०/५५ वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी, त्यांचे सेवा पुनर्विलोकन करुन त्यांना शासन सेवेतून मुदतपूर्व सेवानिवृत्त करावे असे शासनाचे धोरण आहे. त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र. ०१ येथील दि. १०.०६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सेवापुनर्विलोकनासबंधी कार्यपध्दती व सर्वसाधारण सूचना विहित केल्या आहेत. त्यास अनुसरुन आरोग्य सेवा आयुक्तालयांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ अधिकारी/विशेषज्ञ (वेतनस्तर एस-२३) या संवर्गातील अधिकारी तसेच वैद्यकीय अधिकारी,गट-अ (एस-२०) या संवर्गातील अधिकारी यांच्या सेवापुनर्विलोकनाकरीता संदर्भ क्र. ०२ येथील दि. ०२.११.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे अध्यक्षतेखाली विभागीय पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

**शासन निर्णय :**

विभागीय पुनर्विलोकन समितीने केलेल्या शिफारशीस अनुसरुन आरोग्य सेवा आयुक्तालयातर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ तसेच, सामान्य राज्यसेवा गट-अ मधील अधिकारी/विशेषज्ञ (वेतनस्तर एस-२३) या संवर्गातील अधिकारी तसेच वैद्यकीय अधिकारी,गट-अ (एस-२०) या संवर्गातील सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये नमुद केलेल्या एकूण ११ अधिकाऱ्यांची सेवा त्यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा यापैकी जे अगोदर घडेल त्यानंतर चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

संदर्भ क्र. ३ व ४ येथील नमूद प्राप्त प्रस्तावानुसार आरोग्य सेवा आयुक्तालयातर्गंत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट- अ मधील अधिकारी/विशेषज्ञ (वेतनस्तर एस-२३) या संवर्गातील अधिकारी तसेच वैद्यकीय अधिकारी,गट-अ (एस-२०) या संवर्गातील या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी त्यांचे सेवापुनर्विलोकन करण्यासाठीचा विहित प्रस्ताव प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय पुनर्विलोकन समितीसमोर चक्रिय पद्धतीने सादर करण्यात आला होता. विभागीय पुनर्विलोकन समितीने सदर अधिकाऱ्यांच्या सेवेचे मुल्यमापन करुन केलेल्या शिफारशी नुसार ज्या अधिकाऱ्यांना वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी सेवेत राहण्यासाठी पात्र ठरविले आहे त्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. सोबत जोडलेल्या प्रपत्रातील नमूद अधिकाऱ्यांची सेवा त्यांच्या ५०/५५ वर्षानंतर किंवा अर्हताकारी सेवाची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर पुढे चालू ठेवण्यास मान्यता मिळाल्याबाबतची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५०८१२१३४६२२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK NIVARTTI KENDRE

Digitally signed by DEEPAK NIVARTTI KENDRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=438E1C3198EEAF94D4E0935B5B64B843D8C7195FB67EB9E8292985B766C4EFC8, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C351F74FB3439ACA71466FCFBB2509C3310AE753E395A89FFA7C6E3887B0AADF, cn=DEEPAK NIVARTTI KENDRE
Date: 2026.05.08 14:33:15 +05'30'

**( दी.नि.केंद्रे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. संचालक (१) आरोग्य सेवा, आरोग्य भवन, मुंबई
३. संचालक (२) आरोग्य सेवा, पुणे
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अ. व प्र.) मुंबई
५. उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ ( सर्व )
६. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय ( सर्व )
७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. महालेखापाल-१/२, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/नागपूर
१०. संबंधित अधिकारी ( संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे मार्फत)
११. निवडनस्ती सेवा-१

**शासन निर्णय क्र- संकिर्ण-२०२६/ई-१६२६८९०/सेवा-१, दि.०८ मे,२०२६ सोबतचे प्रपत्र**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव व सध्याचे कार्यरत ठिकाण |
|---|---|
| १. | डॉ. संजय कुमारराव मुळे, प्रा.आ.कें. भेंडाळा, ता. गंगापूर, जि. छ. संभाजीनगर |
| २. | डॉ. दत्तात्रय बाबुराव चव्हाण, प्रा.आ.कें. पिंपळनेर, ता. जि. बीड |
| ३. | डॉ.कृष्णकुमार प्रभाकर चौधरी, ता.आ.अ. सेलू, जि. परभणी |
| ४. | डॉ. अनिरुध्द अच्युत आठल्ये, जिल्हा आरोग्य अधिकारी, रत्नागिरी |
| ५. | डॉ. योगेश राजू साळे, प्रायार्च कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र कोल्हापूर |
| ६. | डॉ. भगवंत अंतू पवार, उपसंचालक आरोग्य सेवा ( श्रे.अ.) पुणे |
| ७. | डॉ. कैलास बापू पवार, जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे |
| ८. | डॉ. प्रदिप मन्मथप्पा ढेले, जिल्हा शल्यचिकित्सक, लातूर |
| ९. | डॉ. राधाकिसन पवार, उपसंचालक आरोग्य सेवा ( कुष्ठरोग ), पुणे |
| १०. | डॉ आशिष हिरालाल भारती, उपसंचालक ( कु.क.) ( आरसीएच),पुणे |
| ११. | डॉ. अविनाश नथुराम अहेर, संशोधन अधिकारी रा.कु.क. पुणे |